पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-४११०१८.
क प्रभाग समिती सभा
कार्यपत्रिका क्रमांक- १९
स भा वृ त्तां त

दिनांक ०५/१२/२०१८ वेळ-दुपारी १२.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. "क" प्रभाग समिती मासिक सभा बुधवार दि.५/१२/२०१८ रोजी दुपारी १२.०० वाजता क क्षेत्रीय कार्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजीत करणेत आली होती. सदर सभेस खालीलप्रमाणे मा.नगरसदस्य उपस्थित होते.

१) मा.लोंढे नम्रता योगेश सभापती
२) मा.अश्विनी संतोष जाधव
३) मा.सारीका शिवाजी सस्ते
४) मा.वसंत प्रभाकर बोराटे
५) मा.बोइनवाड यशोदा प्रकाश
६) मा.लांडगे राजेंद्र किसनराव
७) मा.राहुल हनुमंतराव भोसले
८) मा.वैशाली ज्ञानदेव घोडेकर
९) मा.समीर मोरेश्वर मासुळकर
१०)मा.धावडे गोपीकृष्ण भास्कर स्विकृत सदस्य
११) मा.सागर सुखदेव हिंगणे स्विकृत सदस्य

याशिवाय मा.अण्णा बोदडे- क्षेत्रीय अधिकारी, श्री.प्रदीप मुथा - प्रशासन अधिकारी, मा.संजय घुबे-कार्यकारी अभियंता स्थापत्य,मा.नितीन देशमुख- कार्यकारी अभियंता, विदयुत मा.संजय भोसले- कार्यकारी अभियंता जलनिस्सारण, मा.जाधव – उपअभियंता उदयान, मा. शशीकांत दवंडे- उपअभियंता पापु, मा.वायकर- उपअभियंता स्थापत्य, मा.बाळु लांडे – उपअभियंता विदयुत मा.बी.बी.कांबळे- सहा.आरोग्याधिकारी,श्री.एस.व्ही.कांबळे-लघुलेखक,श्री.दवाळे, - आरोग्य निरीक्षक, श्री.भोसले- - कनिष्ठ अभियंता विदयुत,श्री.देसले कनिष्ठ अभियंता पापु , श्री.कोंढरे- अतिक्रमण निरीक्षक हे अधिकारी / कर्मचारी सभेस उपस्थित होते.

**मा.सभापती**- उपस्थित सन्मा.सदस्य/सदस्या, अधिकारी / कर्मचारी सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला.

विषय क्रमांक- ५) मा.क प्रभाग समिती सभा सदस्यांचा अभ्यास दौरा आयोजित करणेबाबत- मा.नम्रता लोंढे,मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव.

दिनांक ३/११/२०१८ व दि.५/११/२०१८ रोजी झालेल्या सभेचा( कार्यपत्रिका क्र.१८ ) सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----

ठराव क्रमांक -३१ विषय क्रमांक- १
दिनांक- ५/११/२०१८ विभाग-
सुचक- मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक-मा.यशोदा बोइनवाड
संदर्भ-मा.राजेंद्र लांडगे व मा.यशोदा बोइनवाड यांचा प्रस्ताव.

भगतवस्ती,गुळवेवस्ती,शांतीनगर,धावडेवस्ती याठिकाणी पाणीपुरवठा अपुरा व विस्कळीत होत आहे.याठिकाणी मोठया प्रमाणात पाण्याची समस्या भेडसावत आहे.अपुरा पाणी पुरवठा होत असल्याची नागरीकांची वारंवार तक्रार येत असल्याने याठिकाणी पाणी पुरवठा सुरळीत होण्यासाठी खुला प्लॉट क्र.४ पेठ क्र.१ नाथसाहेब फ्लॉवर मिल समोर याठिकाणी २५ ते ३० गुंठा जागेवर नवीन टाकी बांधण्यात यावी.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक -३२ विषय क्रमांक- २
दिनांक- ५/११/२०१८ विभाग-
सुचक- मा.राजेंद्र लांडगे अनुमोदक-मा.यशोदा बोइनवाड
संदर्भ- मा.अश्विनी जाधव व मा.नम्रता लोंढे यांचा प्रस्ताव-

**विषय-**प्रभाग क्रमांक २ मधील चिखली बो-हाडेवाडी मोशी शिवेवरील शिव रस्ता त्याला छेदून जाणारा ३० मीटर रस्ता पुणे-नाशिक रोड ते कुदळवाडी या दोन रस्त्याने तयार होणा-या चौकास **“बोल्हाईमाता चौक”** असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत...

**विषय क्रमांक २ फेटाळण्यात येत आहे.**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-----

ठराव क्रमांक -३३ विषय क्रमांक- ३
दिनांक- ५/११/२०१८ विभाग-
सुचक- मा. अश्विनी जाधव अनुमोदक-मा.यशोदा बोइनवाड
संदर्भ- मा.विक्रांत विलास लांडे यांचा प्रस्ताव-

**विषय-**पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्रमांक ८ मधील इंद्रायणीनगर परीसरातील नुतन भाजी मंडईला **“संत तुकाराम महाराज भाजी मंडई”** असे नामकरण करणेस मान्यता देणेबाबत विचार करणे.

**विषय क्रमांक ३ दसरी दाखल करणेत येत आहे.**

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----

ठराव क्रमांक -३४ विषय क्रमांक- ४

दिनांक- ५/११/२०१८ विभाग-

सुचक- मा. समीर मासुळकर अनुमोदक-मा.राहुल भोसले

संदर्भ- मा.समीर मासुळकर,मा.राहुल भोसले यांचा प्रस्ताव-

स्थापत्य विभाग "क" प्रभागाने मासुळकर कॉलनी येथे मासुळकर कॉलनी सुरक्षा केबीन बांधुन पुर्ण करणेत आलेली आहे.पिं.चि.शहरात राज्य शासनाच्या धोरणानुसार नवीन पोलिस आयुक्तालय निर्माण करुन कार्यान्वीत झाले आहे.सदर आयुक्तालयास मोठया प्रमाणात वास्तुची वेगवेगळया विभागासाठी आवश्यकता आहे. सदर मासुळकर कॉलनी सुरक्षा केबीनची मा.पोलिस आयुक्त यांचे अधिकारी व स्थानिक नगरसदस्य मा.समीर मासुळकर यांनी पहाणी केली आहे.सदरची वास्तु पोलिस चौकीसाठी योग्य असलेचे सांगितले या बाबीचा व मा.महापालिका सभा क्र.३२ ठराव क्रमांक ५४५ दि.०५/०८/२०१४ रोजी सदर ठिकाणी पोलिस चौकी बांधणेबाबत ठराव मान्य केलेला आहे.उपरोक्त बाबींचा सारासार विचार करता,स्थानिक नागरीक,नगरसदस्य व मा.महापालिका सभा ठरावानुसार सदरच्या वास्तूस **"मासुळकर कॉलनी पोलिस चौकी"** असे नामकरण करणेस तसेच सदरची वास्तु मा.पोलिस आयुक्त,पिंपरी चिंचवड शहर यांस नाममात्र दराने भाडेतत्वावर हस्तांतर करणेस मान्यता देणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठरावाप्रमाणे कार्यवाही करावी.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

ठराव क्रमांक -३४ विषय क्रमांक- ४

दिनांक- ५/११/२०१८ विभाग-

सुचक- मा.नम्रता लोंढे अनुमोदक-मा.सारीका सस्ते

संदर्भ- मा.नम्रता लोंढे,मा.सारीका सस्ते यांचा प्रस्ताव-

मा.क प्रभाग समिती सभा सदस्य यांच्यासाठी राजस्थान जयपूर येथे आरोग्य विषयक स्वच्छ भारत अभियान संदर्भात डिसेंबर २०१८ अखेर अभ्यास दौरा आयोजित करण्यास व सदर दौ-यांसाठी येणा-या सदस्यांकडुन संमतीपत्र घेवुन त्याकरिता येणा-या प्रत्यक्ष खर्चास मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे.सभावृत्तांत कायम होणेची वाट न पहाता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

-------

सर्वांचे आभार मानून सभा संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

सही/

**(सौ.नम्रता योगेश लोंढे )**

सभापती

क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

क्र-कक्षेका/सभा/कावि/७३/२०१८.

दिनांक ०७ /१२/२०१८

सही/-

**प्रशासन अधिकारी**

**तथा सचिव सभाशाखा**

क प्रभाग समिती

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

प्रत-सर्व संबंधित विभाग

---------------------------